# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील चौथा रविवार

## येशूचे देवालयात समर्पण

## ०२ फेब्रुवारी २०२५

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः बंधू आणि भगिनीं म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. आमच्या प्रार्थना स्वीकारण्यास आपण त्याला विनंती करू या.

प्रतिसाद ः **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, बिशप थॉमस, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना ख्रिस्तसभेची सेवा अधिक प्रभावीपणे करण्यास पवित्र आत्म्याचे साहाय्य व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी त्यांना मिळालेल्या अधिकाराचा वापर सामान्य जनतेच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी करावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. पवित्र मरियेचे शुद्ध व निष्कलंक जीवन व येशूचे देवालयात समर्पण याद्वारे आमचे जीवन शुद्ध, निर्मळ व येशूला अभिप्रित असे असावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. शिमोन ह्या नीतिमान माणसाला मरणापूर्वी प्रभूच्या ख्रिस्ताला पाहण्याचे भाग्य मिळाले व त्याने देवाचा गौरव केला. शिमोनप्रमाणे आपल्याला देखील प्रभूचे तारण पाहण्याचे भाग्य मिळावे तसेच आपल्या तरूणांना प्रभूच्या मळयात काम करण्यासाठी पाचारण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्वांवर विशेषकरून जे आजारी आहेत अशावर प्रभूचा वरदहस्त असावा, अखिल जगात शांती नांदावी, उदया/आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या ख्रिस्तसभेच्या प्रार्थना ऐक. आमच्या श्रद्धेमधील उणिवा तुझ्या प्रेमाने भरून काढ. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.